**L. A. BILL No. XXX OF 2023.**

A BILL

TO ENACT AND AMEND THE MUNICIPAL CORPORATION OF CITY OF PUNE TAXATION RULES FRAMED UNDER THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT, WITH RETROSPECTIVE EFFECT.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३०.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली केलेले पुणे शहर महानगरपालिकेचे कराधान नियम भूतलक्षी प्रभावाने अधिनियमित करण्याकरिता व सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९४९ चा ५९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली केलेल्या पुणे शहर महानगरपालिकेचे कराधान नियम भूतलक्षी प्रभावाने अधिनियमित करणे व सुधारणा करणे आणि त्यांच्या विवक्षित तरतुदींचे विधिग्राह्यीकरण करणे इष्ट आहे, **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

करयोग्य मूल्य निर्धारित करण्यासाठी १ एप्रिल १९७० पासून नियम अधिनियमित करणे.

**२.** पुढील नियम, १ एप्रिल १९७० पासून सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २०२३ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीकरिता, पुणे शहर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य निर्धारित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता कराधान नियम अधिनियमित करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी, करण्यात येत आहेत आणि ते, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५४ अन्वये पुणे शहर महानगरपालिकेने १ एप्रिल १९७० रोजी करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"**१. संक्षिप्त नाव.—** या नियमांस, पुणे शहर महानगरपालिका कराधान (सुधारणा) नियम, १९७०, असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, पुणे शहर महानगरपालिकेला लागू असलेल्या, त्यास जोडलेल्या अनुसूची ' ड ' मध्ये, प्रकरण आठ मधील, नियम ७ मधील, पोट-नियम (१) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल आणि तो, १ एप्रिल १९७० पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"(१) मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य निश्चित करण्याच्या दृष्टीने, जे वार्षिक भाडे घेऊन अशी इमारत किंवा जमीन वर्षावर्षाने वाजवी रीतीने भाड्याने दिली असती त्या वार्षिक भाड्याच्या रकमेतून, उक्त वार्षिक भाड्याच्या पंधरा टक्के इतकी रक्कम वजा करण्यात येईल, आणि उक्त वजावट ही, दुरुस्त्यांबद्दलच्या किंवा जे कोणतेही असेल अशा इतर कोणत्याही कारणाबद्दलच्या सर्व रकमांऐवजी असेल :

परंतु, मालकाने, केवळ त्याच्या निवासी प्रयोजनासाठी भोगवटा केलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा इमारतीच्या भागाच्या बाबतीत, वार्षिक भाड्याच्या रकमेतून, वार्षिक भाड्याच्या चाळीस टक्के इतकी रक्कम वजा करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर मालकाने, केवळ त्याच्या निवासी प्रयोजनासाठी एकापेक्षा अधिक इमारती किंवा इमारतीच्या भागाचा भोगवटा केलेला असेल तर अशा बाबतीत, कोणतीही एक इमारत किंवा इमारतीचा भाग, अशा वजावटीसाठी पात्र असेल.".

करयोग्य मूल्य निर्धारित करण्यासाठी १ एप्रिल २०२३ पासून नियम अधिनियमित करणे.

**३.** पुणे शहर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य निर्धारित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता कराधान नियम अधिनियमित करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करण्यात येत आहेत आणि ते, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५४ अन्वये पुणे शहर महानगरपालिकेने १ एप्रिल २०२३ रोजी करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"**१. संक्षिप्त नाव.—** या नियमांस, पुणे शहर महानगरपालिका कराधान (सुधारणा) नियम, २०२३, असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, पुणे शहर महानगरपालिकेला लागू असलेल्या, त्यास जोडलेल्या अनुसूची ' ड ' मध्ये, प्रकरण आठ मधील, नियम ७ मधील, पोट-नियम (१) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल आणि तो, १ एप्रिल २०२३ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"(१) मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य निश्चित करण्याच्या दृष्टीने, जे वार्षिक भाडे घेऊन अशी इमारत किंवा जमीन वर्षावर्षाने वाजवी रीतीने भाड्याने दिली असती त्या वार्षिक भाड्याच्या रकमेतून, उक्त वार्षिक भाड्याच्या दहा टक्के इतकी रक्कम वजा करण्यात येईल, आणि उक्त वजावट ही, दुरुस्त्यांबद्दलच्या किंवा जे कोणतेही असेल अशा इतर कोणत्याही कारणाबद्दलच्या सर्व रकमांऐवजी असेल :

परंतु, मालकाने, केवळ त्याच्या निवासी प्रयोजनासाठी भोगवटा केलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा इमारतीच्या भागाच्या बाबतीत, वार्षिक भाड्याच्या रकमेतून, वार्षिक भाड्याच्या चाळीस टक्के इतकी रक्कम वजा करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जर मालकाने, केवळ त्याच्या निवासी प्रयोजनासाठी एकापेक्षा अधिक इमारती किंवा इमारतीच्या भागाचा भोगवटा केलेला असेल तर अशा बाबतीत, कोणतीही एक इमारत किंवा इमारतीचा भाग, अशा वजावटीसाठी पात्र असेल.".

१९४९ चा ५९.

करयोग्य मूल्याच्या निर्धारणाकरिता, दिलेल्या वार्षिक भाड्यातून वजा केलेल्या रकमेचे विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये (यात यापुढे, या कलमात ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, १ एप्रिल, १९७० रोजी सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २०२३ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीमधील, इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य निश्चित करण्याच्या अनुषंगाने केलेली कोणतीही कारवाई किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टी यांसह, उक्त अधिनियमाच्या तरतुदींन्वये कृती करणाऱ्या किंवा कृती करण्याचे अभिप्रेत असणाऱ्या, पुणे शहर महानगरपालिकेने किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा प्राधिकाऱ्यांनी, उक्त अधिनियमाच्या अनुसूची 'ड' च्या प्रकरण आठ च्या नियम ७ च्या पोट-नियम (१) च्या तरतुदींनुसार, वार्षिक भाड्यातून दिलेली वजावटीची कोणतीही रक्कम ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या उक्त नियमांच्या तरतुदी, जणू काही १ एप्रिल १९७० पासून, सातत्याने अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितपणे व वैधरीतीने वजा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती नेहमीकरिता वजा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,—

(अ) मालमत्ता कराच्या कोणत्याही आकारणीच्या, बसविण्याच्या, मागणीच्या, गोळा करण्याच्या किंवा पुर्नविलोकन करण्याच्या अथवा वार्षिक भाड्याच्या रकमेतून दिलेल्या कोणत्याही वजावटीच्या संबंधात, उक्त महानगरपालिकेने किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा प्राधिकाऱ्यांनी केलेल्या सर्व कारवाया, किंवा कार्यवाह्या किंवा गोष्टी ह्या, उक्त अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार करण्यात आल्याचे किंवा हाती घेण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्या नेहमीकरिता करण्यात किंवा हाती घेण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशा रीतीने बसविलेल्या व गोळा केलेल्या मालमत्ता कराच्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी महानगरपालिकेविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा प्राधिकाऱ्यांविरुद्ध कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही अधिकाऱ्यासमोर किंवा प्राधिकाऱ्यासमोर कोणताही दावा, अपील किंवा इतर कार्यवाह्या दाखल करता येणार नाहीत किंवा चालविता येणार नाहीत ;

(क) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण अशा प्रकारे बसविलेल्या व गोळा केलेल्या मालमत्ता कराच्या कोणत्याही रकमेच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश जारी करणार नाही ;

(ड) वार्षिक भाड्यापोटी अधिक प्रमाणात बसविलेली किंवा गोळा केलेली मालमत्ता कराची कोणतीही रक्कम, परत करण्यात येणार नाही आणि ती, उक्त अधिनियमान्वये देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेपोटी समायोजित करण्यात येईल.

(२) शंका निरसनार्थ, याद्वारे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट, एखाद्या व्यक्तीला,—

(अ) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता कराची किंवा कोणत्याही वजावटीची कोणतीही आकारणी करण्यास, बसविण्यास, मागणी करण्यास, गोळा करण्यास किंवा पुर्नविलोकन करण्यास, हरकत घेण्यास ; किंवा

(ब) मुख्य अधिनियमान्वये मालमत्ता कराच्या स्वरुपात तिच्याकडून देय असलेल्या रकमेपेक्षा तिने अधिक प्रमाणात भरणा केलेल्या कोणत्याही मालमत्ता कराच्या परताव्याची मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई महानगरपालिके व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांनी जमिनींवर व इमारतींवर, जमिनीच्या व इमारतींच्या करयोग्य मूल्याच्या आधारावर मालमत्ता कर बसवलेले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) यास जोडलेल्या अनुसूची 'ड' च्या प्रकरण आठच्या, नियम ७ मध्ये, करयोग्य मूल्य निर्धारित करण्याची तरतूद केली आहे. उक्त अधिनियमाचे कलम ४५४ हे, उक्त अनुसूची 'ड' मध्ये कोणताही नियम, जादा दाखल करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा, फेरबदल करण्याचा किंवा विलोपन करण्याचा अधिकार, महानगरपालिकेस प्रदान करते.

उक्त अधिनियमाच्या कलम ४५५ च्या पोट-कलम (१) मध्ये अशी तरतूद आहे की, महानगरपालिका, राज्य शासनाच्या मंजुरीस अधीन राहून आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, उक्त अधिनियमाच्या कलम ४५४ अन्वये नियम करील. उक्त कलम ४५५ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, उक्त कलम ४५४ अन्वये केलेले नियम, अंतिम स्वरूपात **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील आणि त्यानंतर, जणू काही ते उक्त अधिनियमामध्ये अधिनियमित करण्यात आले होते असे समजून अंमलात येतील.

कराधान नियमाच्या नियम ७ च्या पोट-नियम (१) नुसार, मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य निश्चित करताना वार्षिक भाड्याच्या रकमेच्या, दहा टक्के इतकी रक्कम, दुरुस्त्यांबद्दलच्या किंवा जे कोणतेही असेल, अशा अन्य कोणत्याही कारणाबद्दलच्या सर्व रकमांऐवजी, वार्षिक भाड्याच्या रकमेतून, वजा करण्यात येईल.

२. जमिनीच्या किंवा इमारतीच्या वार्षिक भाड्याच्या पंधरा टक्के आणि मालकाने केवळ त्याच्या निवासी प्रयोजनाकरिता भोगवटा केलेल्या इमारतीच्या किंवा इमारतीच्या भागाच्या वार्षिक भाड्याच्या चाळीस टक्के इतक्या रकमेची वजावट करण्यासाठी तरतूद करता यावी म्हणून, कराधान नियमांच्या नियम ७ च्या पोट-नियम (१) मध्ये सुधारणा करण्यासाठी पुणे शहर महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रारुपास, राज्य शासनाने, उक्त अधिनियमाच्या कलम ४५५ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याच्या दिनांक ३ डिसेंबर १९६९ च्या पत्राद्वारे मंजुरी दिली होती. तथापि, उक्त कलम ४५५ च्या पोट-कलम (२) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, उक्त महानगरपालिकेने उक्त अधिसूचना, अंतिम स्वरूपात **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेली नव्हती. पुणे शहर महानगरपालिकेने, उक्त प्रारूप अधिसूचनेच्या आधारे, दिनांक १ एप्रिल १९७० पासून अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या वार्षिक भाड्यामध्ये पंधरा टक्के व चाळीस टक्के इतकी वजावट दिली होती. म्हणून, उक्त अतिरिक्त पाच टक्क्यांची व चाळीस टक्क्यांची वजावट, उक्त नियमांच्या तरतुदींनुसार नाही.

३. म्हणून, उक्त नियम भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच १ एप्रिल १९७० पासून अंमलात आणण्यासाठी अधिनियमित करणे व त्यात सुधारणा करणे आणि पुणे शहर महानगरपालिकेने याबाबत केलेल्या कारवाया विधिग्राह्य करणे आवश्यक आहे, जेणेकरून, उक्त वजावट केलेली रक्कम, उक्त महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकांकडून वसूल केली जाणार नाही.

४. म्हणून,—

(क) उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची 'ड' च्या प्रकरण आठ च्या, नियम ७ चे पोट-नियम (१) भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच,—

(एक) सर्व इमारतींच्या आणि जमिनींच्या वार्षिक भाड्याच्या पंधरा टक्के रकमेची वजावट देण्यासाठी, १ एप्रिल १९७० पासून ते ३१ मार्च २०२३ पर्यंत ;

(दोन) मालकाने, केवळ त्याच्या निवासी प्रयोजनासाठी भोगवटा केलेल्या इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या वार्षिक भाड्याच्या चाळीस टक्के रकमेची वजावट देण्यासाठी, १ एप्रिल १९७० पासून ;

(तीन) सर्व इमारतींच्या व जमिनींच्या वार्षिक भाड्याच्या दहा टक्के रकमेची वजावट देण्यासाठी, १ एप्रिल २०२३ पासून ;

अधिनियमित करण्यासाठी व सुधारणा करण्यासाठी ; आणि

(ख) मालमत्ता कराची आकारणी करणे, बसविणे, गोळा करणे, इत्यादींच्या बाबतीत पुणे शहर महानगरपालिकेने केलेल्या सर्व कारवाया विधिग्राह्य करण्यासाठी,

अधिनियम करणे इष्ट वाटते.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २१ जुलै, २०२३.

**एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ५.—** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, या अधिनियमाच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३०. ]**

**[ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली केलेले पुणे शहर महानगरपालिकेचे कराधान नियम भूतलक्षी प्रभावाने अधिनियमित करण्याकरिता व सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[ श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री. **]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.